अपीलकर्ता: कैलास पार्क, मे. उमया असोसिएट, तुलशेत पाडा येथील नवीन निवासी व वाणिज्य वीज जोडणी संदर्भात दिनांक ०२.०६.२०१० च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी कोणतेही उत्तर दिले नाही. म्हणून अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. परंतु त्यानी निर्णय दिला नाही व माहितीही मिळाली नाही. वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही विहित मुदतीत उत्तर न देता, जन माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक १७.०८.२०११ रोजी उत्तर दिले. राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाच्या सुनावणीची नोटीस जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम आढळ व अपिलीय प्राधिकरी श्री. दिलीप डुंबरे याना मिळाल्यानंतर जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम आढळ यानी राजकीय व्यक्ती / गुडांमार्फत दबाव आणून धमक्या दिल्या, माझ्या अनुपस्थितीत माझ्या वृध्द आई व पत्नी यांना धमकावून काही कागदपत्रांवर त्यांच्या सह्या घेतल्या नंतर दूरध्वनीवरुनही अर्वाच्य भाषा वापरली. अपीलकर्ता यानी याच आशयाचे लेखी निवेदन सादर केले.

जन माहिती अधिकारी : आमच्या विभागात कामाचा प्रचंड ताण असतो. अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती सन २००७ मधील होती. आमचे उपविभाग कार्यालय तेव्हा अस्तित्वात नव्हते, ते जानेवारी सन २००९ पासून सुरु झाले. माहिती मे. उमेया बिल्डर्स यांच्या संदर्भात होती. त्याना दिलेल्या वीज जोडणीबाबतची माहिती त्यांच्याकडून मागविण्याचा प्रयत्न केला असता कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. सदर बाब श्री. रमेश खानविलकर याना कळविली होती. त्यानंतर उमेया बिल्डर्सकडून माहिती प्राप्त करुन घेतली व श्री. रमेश खानविलकर याना पुरविली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास १५ महिन्यांनी माहिती देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम आढळ यानी दिलेली कारणे लक्षात घेऊनही हा विलंब क्षम्य ठरत नाही. म्हणून या विलंबाचे स्पष्टीकरण व शास्तीबाबतचे म्हणणे जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम आढळ यानी लेखी स्वरुपात सादर करावे. त्यानंतर शास्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम आढळ यानी दिनांक २१.०९.२०११ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. सुनावणीच्या वेळी केलेल्या निवेदनाबरोबरच त्यानी अधिक तपशील खुलाशात नोंदविला आहे. उमेया बिल्डर्स यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर श्री. रमेश खानविलकर याना दूरध्वनी द्वारे कळविले होते. परंतु व्यक्तिशः माहिती घेणार असल्याचे नमूद केले असूनही ते आले नाहीत. त्यामुळे विशेष दूतामार्फत त्याना घरपोच माहिती दिली व रजिस्टर पोस्टाद्वारे एक प्रत पाठविली. श्री. रमेश खानविलकर हे स्वतः श्री. उमेया बिल्डर यांच्या इमारतीत फ्लॅटधारक आहेत. त्यांनी माहिती मागितली आहे त्या कार्यालयातील बरेचसे कर्मचारी निवडणुकीच्या कामात कार्यरत होते. उपविभागामध्ये जवळ जवळ पाच पदे रिक्त आहेत. तांत्रिक कामाचा प्रचंड ताण असताना माहितीच्या अधिकाराकडे मुद्दामहून दुर्लक्ष केलेले नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम आढळ यानी खुलाशात म्हटले आहे. त्यानी नमूद केलेल्या सर्व बाबी विचारात घेऊनही माहिती देण्यास झालेल्या १३ महिन्यांचा विलंब क्षम्य ठरत नाही. त्यांच्या सर्व अडचणी लक्षात घेऊन सहा महिन्यांचा विलंब क्षम्य मानला तरी ऊर्वरित कालावधीच्या विलंबाबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम आढळ यानी दबाव आणला, धमक्या दिल्या या तक्रारीबाबत आवश्यक असल्यास अपीलकर्ता रीतसर कायदेशीर मार्गाचा अवलंब करु शकतात. त्याबाबत पोलिसात तक्रार नोंदविली असल्याचे त्यानी नमूदही केले आहे.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम आढळ यानी अपीलकर्ता श्री. रमेश खानविलकर याना माहिती देण्यास केलेल्या विलंबाबद्दल त्याना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु. २५,०००/- ची शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्तीवसुली अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. दिलीप डुंबरे यानी जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम आढळ याना डिसेंबर २०११, जानेवरी २०१२, फेब्रुवारी-२०१२ व मार्च २०१२ मध्ये मिळणाऱ्या नोव्हेबंर- २०११, डिसेंबर-२०११, जानेवारी- २०१२ व फेब्रुवारी-२०१२ च्या दरमहा वेतनातून चार हफ्त्यात वसूल करुन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा. सदर शास्तीची वसुली शासनाने विहीत केलेल्या लेखाशिर्ष " क्र. ००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" मध्ये जमा करण्यात यावी.

**सही/-**
**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई.**
**दिनांक: २०.०९.२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अवये दाखल झालेले अपील.**

क्र: मुमाआ/नोंदणी क्र.५०७५४/अपील क्र.६९०७/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० ऑक्टोबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

सचिव
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१) निवडनस्ती (शास्ती)
२) स्वीय सहाय्यक

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. वैभव चंद्रकांत कोरगांवकर,
४८/३, राधाकृष्ण निवास,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई ४०००१४. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा
पोलीस उपआयुक्त (मुख्या-१),
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट समोर,
डी. एन रोड, मुंबई ४००००१. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सहा. पोलीस आयुक्त (मुख्या-१),
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट समोर,
डी. एन रोड, मुंबई ४००००१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९०८/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २०.०९.२०११ |

**३ उपस्थित**
श्री. त्रिंबक आ. घोबळे
**जन माहिती अधिकारी** तथा सहा. पोलीस आयुक्त (मुख्या-१),
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट समोर,
डी. एन रोड, मुंबई ४००००१.

| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

**विवेचन**

पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यानी भारत संरक्षण कायद्याखाली घेतलेल्या खाजगी जागेबाबतची सन १९३९ पासूनची माहिती अपीलकर्ता श्री. वैभव चंद्रकांत कोरगांवकर यानी मागितली होती. जन माहिती अधिकारी / सहाय्यक जन माहिती अधिकारी यानी कोणतेही उत्तर दिले नाही. माहिती सात दिवसांत देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम ७ (९) अन्वये (मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्याने) माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व संपूर्ण माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.वैभव चंद्रकांत कोरगांवकर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती सन १९३९ पासूनची होती. जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलिस आयुक्त (मुख्या-१) श्री. त्रिंबक आ. घोबळे यानी अर्ज प्रशासकीय अधिकारी, कक्ष-८ (इमारती शाखा), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्याकडे वर्ग केला व माहितीबाबत पाठपुरावाही केला. परंतु सन १९३९ पासूनची माहिती संकलित करुन देण्यासाठी मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्याचे कळवून त्यानी माहिती नाकारली. मात्र त्यानंतरही जवळ जवळ एक हजार पृष्ठांच्या प्रती अपीलकर्त्यास पुरविल्या. याबाबत अपीलकर्त्यास अवगत करणारा पत्रव्यवहार मात्र केला गेला नाही. परंतु माहितीचा शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती पुरविली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. त्रिंबक आ. घोबळे यानी केले.

जन माहिती अधिकारी यानी सहाय्य मागितल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम ५ (४, ५) अन्वये मानीव जन माहिती अधिकारी ठरणारे कर्मचारी/अधिकारी यांनी माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबतचा लेखी खुलासा सादर करावा, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळेस दिले. त्यानुसार दिनांक २१.०९.२०११ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. त्रिंबक आ.घोबळे यानी या खुलाशासह अहवाल आयोगास सादर केला.

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती सन १९३९ पासूनची- ७०वर्षांहून अधिक कालावधीची असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. अपीलकर्त्यास तसे लेखी कळविले नाही, ही चूक असून यापुढे दक्षता घेण्यात येईल. मात्र माहिती पुरविण्यासाठी उपलब्ध असलेल्या नस्त्या अपीलकर्त्यास निरीक्षणासाठी दिल्या व त्याना त्यातील १०१३ पृष्ठांच्या छायांकित प्रती पुरविल्या असा खुलासा तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री. हेमंत किसन भालेराव व तत्कालीन वरिष्ठ लिपिक श्री. नरेंद्र शांताराम वालावलकर यानी केला आहे. राधाकृष्ण निवास, दादर, मुंबई येथील इमारतीतील काही सदनिकांमध्ये पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयातील कर्मचारी शासकीय निवासस्थान म्हणून वास्तव्यास असलेल्या सदनिकांसंबंधात माहिती मिळणेकरिता श्री. वैभव चंद्रकांत कोरगावकर यानी दिनांक ३१.०१.२००९ पासून ९ वेळा या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज केले आहेत. सदर अर्जांच्या अनुषंगाने वेळोवेळी उचित माहिती /अभिलेख पुरविलेली आहे, असेही श्री. नरेंद्र शांताराम वालावलकर यानी नमूद केले आहे. त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. माहितीबाबत केल्या जाणाऱ्या कार्यवाहीविषयी अपीलकर्त्यास वेळीच अवगत केले पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी श्री.त्रिंबक आ. घोबळे याना देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**सही/-**
**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई.**
**दिनांकः २०.०९.२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अवये दाखल झालेले अपील.**

क्र: मुमाआ/नोंदणी क्र.०३०/अपील क्र.६९०८/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,

मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० ऑक्टोबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

1. **१) निवडनस्ती**
2. **२) स्वीय सहाय्यक**

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. वसंत निवृत्ती निकाळजे,
सम्राट अशोक चाळ नं.०१,रुम नं. २२३,
मुकुंद नगर, पी.एल. लोखंडे मार्ग,
चेंबूर(प.), मुंबई ४०००८९. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी,**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट),
वरिष्ठ कर्मचारी अधिकारी कार्यालय, कर्मचारी विभाग,
बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी,**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट),
वरिष्ठ कर्मचारी अधिकारी कार्यालय, कर्मचारी विभाग,
बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९१५/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २०.०९.२०११ |

**३ उपस्थित**

श्री. स.ना.नारायणकर,
**प्रथम अपिलीय अधिकारी**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट),
वरिष्ठ कर्मचारी अधिकारी कार्यालय, कर्मचारी विभाग,
बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१.

| | |
|---|---|
| श्री. उमेश शां. कामेरकर,<br>**जन माहिती अधिकारी**<br>बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट),<br>वरिष्ठ कर्मचारी अधिकारी कार्यालय, कर्मचारी विभाग,<br>बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१. | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

बेस्ट उपक्रमांमध्ये कर्मचारी विभाग, कुलाबा यांच्याकडून, शिल्लक असलेल्या ज्यु. डेटा एंन्ट्री ऑपरेटर पदांसाठी विशेष मागासवर्गीय रिक्त पदांचा खास अनुशेष भरुन काढण्यासाठी दिनांक १८/०९/२०१० रोजी घेतलेल्या परीक्षेविषयीची माहिती अपीलकर्ता श्री. वसंत निवृत्ती निकाळजे यानी मागितली होती. माहिती विद्युत-परमाणु संस्करण विभागाशी संबधित असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला व त्यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपीलकर्त्यास पुरविली. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार संबंधित संचिका अपीलकर्त्यास निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या व त्यांच्या मागणीनुसार सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या. अपिलावरील कार्यवाहीची वाट न पाहता सहा दिवसांत- म्हणजेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीच्या मुदतीआधीच त्यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.उ.शां.कामेरकर यानी केले.

जन माहिती अधिकारी श्री. उ.शां.कामेरकर यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत अर्ज वर्ग केला. मात्र विद्युत-संस्करण विभागातील अपिलीय प्राधिकारी श्री. स.ना.नारायणकर यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याची समज त्याना देण्यात येत आहे. अपीलकर्त्यांनी अर्जामध्ये विविध स्वरुपाचे भाष्य केले असून आक्षेप नोंदविले आहेत व 'पात्र उमेदवारांची नियुक्ती करुन भरती प्रक्रिया पूर्ण करण्याची ' मागणी केली असून व त्याची माहिती मिळावी, असे म्हटले आहे. ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही व अधिनियमाच्या कलम २ मधील 'माहिती ' च्या संज्ञेत येत नाही.

**आदेश**

१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

**सही/-**
**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई.**
**दिनांकः २०.०९.२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अवये दाखल झालेले अपील.**

क्रः मुमाआ/नोंदणी क्र.१०१/अपील क्र.६९१५/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० ऑक्टोबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा <u>अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. एम.जी.रामचंद्र,
आर्केड (इंडिया), प्रा.लि.,
१०१, मेरी लॅण्ड कॉर्नर, सायन,
मुंबई ४०००३२.

अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
नगर विकास विभाग (नवि-१०),
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग (नवि-१०),
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८२९/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २९.०९.२०११ |
| **३** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. एम.जी.रामचंद्र, आर्केड (इंडिया), प्रा.लि., १०१, मेरी लॅण्ड कॉर्नर, सायन, मुंबई ४०००३२.<br>**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग (नवि-१०), मंत्रालय, मुंबई ४०००३२. नावः श्री.संजू क. गुप्ते. | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

**अपीलकर्ता:** श्री. ओमशांती को. ऑप. हौ. सोसायटी, ऐरोली, नवी मुंबई, या सोसायटीमधील भ्रष्टाचारासंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सन १९९३ मध्ये नेमलेल्या उच्चस्तरीय समितीच्या अहवालाची प्रत व त्यावरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. सिडकोने त्याबाबतचा अहवाल नगर विकास विभागाच्या सचिवांना सादर केला असल्याचे सांगण्यात आले. मात्र यातील कोणतीही माहिती नगर विकास विभागाकडून मिळाली नाही.

**जन माहिती अधिकारी :** उपरोक्त सोसायटीसंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी चालू असल्यामुळे त्यातील बव्हंश कागदपत्रे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपविण्यात आलेली आहेत. सन १९९१-९२ मधील नगर विकास विभागाडील मूळ संचिकेची प्रत अपीलकर्ता श्री. एम. जी. रामचंद्र याना दिलेली आहे. संबंधित उच्चस्तरीय चौकशीच्या समितीचा अहवाल आदी कागदपत्रे सिडकोकडे असून अपीलकर्ता श्री. एम. जी. रामचंद्र याना तसे कळविले होते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता नगर विकास विभागाकडील अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता श्री. एम. जी. रामचंद्र प्राप्त करुन घेऊ शकतात. संबंधित उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल नेमका कोणत्या विभागाकडे आहे, हे अपीलकर्ता श्री. एम. जी. रामचंद्र यानी पुराव्यादाखल सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होत नाही. संबंधित कागदपत्रे सिडकोकडे आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री. राजेश गोविल याचे म्हणणे आहे. अपीलकर्ता श्री. एम. जी. रामचंद्र याच्या मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.राजेश गोविल यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार पाच दिवसांत सिडकोकडे वर्ग करणे आवश्यक होते. आता अपीकर्त्याच्या मूळ अर्जाची प्रत सिडकोकडे पाठवून जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री. राजेश गोविल यानी सिडकोकडून त्याबाबतीत अधिकृत उत्तर

प्राप्त करुन घेऊन अपीलकर्ता श्री. एम. जी. रामचंद्र यास माहिती पुरवावी. संबंधित माहिती सिडकोकडे नसल्यास उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल व त्यावरील कार्यवाहीबाबतची कागदपत्रे कोणत्या विभागाकडे आहेत याचा शोध घेऊन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री. राजेश गोविल यानी अपीलकर्ता श्री. एम.जी. रामचंद्र याना कळवावे व १५ दिवसांत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. असा अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री. राजेश गोविल यानी आयोगाला अद्याप सादर केलेला नाही, ही बाब गंभीर आहे.

**आदेश**

**१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री. राजेश गोविल यानी, विलंबाच्या कारणांसह, हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.**

**सही/-**

**मुंबई** **(विजय कुवळेकर)**
**दिनांकः२९/०९/२०११.** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रः मुमाआ/नोंदणी क्र.४७९०७/अपील क्र.६८२९/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ डिसेंबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**

**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. शेखर गोविंद तोडकर,
१६७, शांती भवन, ३रा मजला,
बोराबाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, अे-विभाग कार्यालय,
शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई-४००००१. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, अे-विभाग कार्यालय,
शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई-४००००१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९१४/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २०.०९.२०११ |
| **३. उपस्थिती -**<br>**अपिलकर्ता -** अनुपस्थित<br>**प्रथम अपिलीय अधिकारी -**अनुपस्थित.<br>**जन माहिती अधिकारी -** चंद्रकांत शंकर पांचाळ उपस्थित. | | |
| **४.** माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची(जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | | |

**विवेचन**

शांतीभुवन, बोराबाजार स्ट्रीट,फोर्ट, मुंबई या इमारतीमध्ये रहिवासी किती,भाडेकरु किती,याबाबत, तसेच त्यांच्यावरील कर आकारणीबाबत माहिती मागितलेली माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता यानी मागणी केली आहे तशा स्वरुपाच्या नोंदी ठेवल्या जात नाहीत. मात्र त्या संदर्भातील अभिलेख अवलोकन करावयाचे असल्यास उपलब्ध करुन देण्यात येतील, असे अपीलकर्ता याना कळविण्यात आले होते. परंतु त्यानुसार अवलोकन न करता त्यानी प्रथम अपील

केले. मात्र ३ तारखा देऊनही अपीलकर्ता सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे अपिलीय अधिकारी यानी अपील निकाली काढले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.चंद्रकांत शंकर पांचाळ यानी पूरक कागदपत्रांसह केले.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(विजय कुवळेकर)**
**दिनांक- २०.९.२०११** **प्रभारी मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१००/अपील क्र.६९१४/२०११/०२
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :५ नोव्हेंबर,२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,
१)निवड नस्ती
२)स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. रेखा विलास मापुसकर,
बी/८०४, महादेव टॉवर,ठाकूर कॉंप्लेक्स,
कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१.(अपील क्र. ६९१२) अपीलकर्ता

श्रीमती जयश्री डी. जोशी,
सी-६/१३, ब्रिझी अपार्टमेंट, एलआयसी कॉलनी,
कर्नाटक बँकेमागे,३रा मजला, मुंबई-४००१०३.(अपील क्र.६९१३) अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
वेतन व भ.नि.नि. पथक, शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई,
पश्चिम विभाग कार्यालय, इस्माईल युसुफ कॉलेज कँपस,
जोगेश्वरी(पूर्व), मुंबई-४०० ०६०. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी,**
श्रीमती टी.एस.बाफना कनिष्ठ महाविद्यालय,
बी.जे.पटेल रोड, मालाड(प.), मुंबई-४०००६४.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९१२/२०११/मुंबई<br>६९१३/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २०.०९.२०११ |
| **३. उपस्थिती-**<br>**अपीलकर्त्या -** श्रीमती रेखा मापुसकर,श्रीमती जयश्री जोशी- उपस्थित<br>**प्रथम अपिलीय अधिकारी -**अनुपस्थित.<br>**जन माहिती अधिकारी -** श्रीम.भा.शा पगारे,अधीक्षक, डॉ.रा.रा.जाधव,प्राध्यापक-उपस्थित | | |
| **४.** माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची(जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी,अपिलीय प्राधिकारी व अपिलकर्त्या यांनी आपयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे प्रतिपादन केले:

अपीलकर्त्या : भविष्य निर्वाह निधी खात्यातील नोंदींचा महिनावार व्याजासह तपशील मिळण्याची मागणी होती. आमच्याकडील नोंदी व एम.डी.शहा महाविद्यालय/श्रीमती टी.एस.बाफना कनिष्ठ महाविद्यालय आणि वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई,पश्चिम विभाग यांच्या कार्यालयाने दिलेली माहिती यात तफावत आहे. महिनावार व्याजासह तपशील मिळाला पाहिजे. तरच व्याज व भविष्य निवार्ह निधीपोटी कपात केलेली रक्कम याच्या योग्यायोग्यतेची शहानिशा करता येईल.

जन माहिती अधिकारी(भ.नि.नि.विभाग) : दर वर्षाच्या अखेरीस भविष्य निर्वाह निधीबाबतच्या ताळमेळासंबंधीची चिठ्ठी संबंधित शाळा/महाविद्यालयाकडे पाठविली जाते. त्यात काही त्रुटी असल्यास दोन महिन्यांच्या आत संबंधित कर्मचा-याने कार्यालयास अवगत करणे आवश्यक असल्याचे भ.नि.नि. चिठ्ठीमध्ये स्पष्टपणे नमूद केलेले असते. सन २००० ते मार्च २००९ पर्यंत अशी तक्रार अपीलकर्त्यांनी नोंदविलेली नाही. तरीही त्यांच्या मागणीनुसार संबंधित लेखे प्रत्यक्ष तपासणीसाठी देऊन त्यांना हवी असलेली माहिती पुरविण्यात आली आहे. संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाला व या कार्यालयाला जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या हेतूने अपीलकर्त्यांनी सातत्याने माहिती-मागणी व अन्य पत्रव्यवहार केला आहे.

जन माहिती अधिकारी(एम.डी.शहा महिला महाविद्यालय) : महाविद्यालयाकडून भविष्य निर्वाह निधीबाबतच्या संबंधित नोंदी अपीलकर्त्यांना त्या त्या वेळी देण्यात आल्या आहेत. सर्व रजिस्टर्ससुध्दा त्यांना अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आली. अभिलेखातील नोंदींनुसारच माहिती देण्यात आली असून त्यांच्या मागणीनुसार हिशेब करुन स्वतंत्रपणे माहिती देता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पहाता भविष्य निर्वाह निधी-साठीची कपात व त्यावरील व्याज योग्य नसल्याची अपीलकर्त्यांची तक्रार आहे,असे दिसून येते. परंतु सदर बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कक्षेत येत नाही. ज्या स्वरुपात कार्यालयात नोंदी ठेवल्या जातात त्या स्वरुपात माहिती अपिलकर्त्यांना देण्यात आली आहे. अन्य कोणत्याही अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती त्यांना हव्या असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येतील.

**आदेश**

**अपिले अमान्य करण्यात येत आहेत.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई.**
**दिनांक: २०.०९.२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.९९/अपील क्र.६९१३/२०११/०२

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.९५/अपील क्र.६९१२/२०११/०२
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२२ नोव्हेंबर,२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,

१) निवड नस्ती
२) स्वीय सहाय्यक
३) आवक लिपीक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.९५/अपील क्र.६९१२/२०११/०२
क्र.मुमाआ/नोंदणी क्र.९९/अपील क्र.६९१३/२०११/०२
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :४ नोव्हेंबर,२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,
१)निवड नस्ती
२)स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा <u>अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्रीमती विशाखा विनायक इंगळे,
बी/६, अलंकार को.हौ.सोसायटी,
नवीन टिळकनगर, चेंबूर(प.),
मुंबई ४०००८९.

अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (म.न.पा.),
शिक्षणधिकारी (म.न.पा.) कार्यालय,
लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी,
दादर (पू.), मुंबई ४०००१४. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशा.अधिकारी (शिक्षण),
शिक्षणधिकारी (म.न.पा.) कार्यालय,
लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी,
दादर (पू.), मुंबई ४०००१४.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९०९/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २०.०९.२०११ |

**३ उपस्थिती**

**अपीलकर्त्या** श्रीमती विशाखा विनायक इंगळे,
बी/६, अलंकार को.हौ.सोसायटी,
नवीन टिळकनगर, चेंबूर(प.),
मुंबई ४०००८९. - उपस्थित

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी- श्री.मिर्झा निसार बेग,
शिक्षणधिकारी (म.न.पा.) कार्यालय,
लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी,
दादर (पू.), मुंबई ४०००१४ - उपस्थित

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशा.अधिकारी (शिक्षण)-
श्री.अशोक बोज्जा,श्रीमती प्रांजली गोसावी,

| | |
|---|---|
| | शिक्षणधिकारी (म.न.पा.) कार्यालय,<br>लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी,<br>दादर (पू.), मुंबई ४०००१४ - उपस्थित. |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत तक्रारदार व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले.

अपीलकर्त्याः निलंबन तसेच रुजू झाल्यापासूनच्या कालावधीतील वेतन देण्यासंदर्भातील अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्धवट,खोटी,दिशाभूल करणारी माहिती दिली. अद्यापपर्यंत परिपूर्ण माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी: अपीलकर्त्या यानी मागितलेली माहिती आमच्या कार्यालयात नव्हती. म्हणून त्यांचा अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आला. अपीलकर्त्यांची मागणी मूळ प्रकरणातील चौकशीच्या संदर्भात असून त्याबाबतची कागदपत्रे विभागीय चौकशी अधिका-यांकडे आहेत.

जन माहिती अधिका-यांकडे संबंधित माहिती उपलब्ध नसल्यास अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ५ दिवसांच्या आत तो वर्ग करणे माहितीचा अधिकार,२००५ मधील तरतुदीनुसार बंधनकारक आहे. संबंधित माहिती विभागीय चौकशी अधिका-यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिका-यांनी नमूद केले असून ही माहिती त्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिका-यांनी अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावी. तसेच तत्कालीन जन माहिती अधिका-यांनी मूळ अर्जावर माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्याबाबतचा अहवाल व खुलासा आयोगाला अद्याप प्राप्त झालेला नाही. 'तसेच दि.२७.९.२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेलो असता माहिती मिळाली नाही', अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती विशाखा इंगळे यांनी दि.२९.९.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली आहे.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य.

२)आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्य कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी श्री.अशोक बोज्जा यांनी दि.१५.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. माहिती देण्याबाबत आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्यास ते शास्तीस पात्र ठरतील. त्याबाबतचे म्हणणेही त्यानी अहवालात नमूद करावे.

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांकः २०.०९.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.४२/अपील क्र.६९०९/२०११/०२
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :५ नोव्हेंबर,२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,
१)निवड नस्ती
२)स्वीय सहाय्यक

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. एस.एन.शाह,
प्लॉट नं, ५१, ओझा स्ट्रीट,
गंगाराम चाळीजवळ, पाण्याची बावडी,
शिवडी क्रॉस रोड, मुंबई ४०००१५. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी,
शिक्षणधिकारी (म.न.पा.) कार्यालय,
लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी,
दादर (पू.), मुंबई ४०००१४. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशा. अधिकारी (शिक्षण),
शिक्षणधिकारी (म.न.पा.) कार्यालय,
लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी,
दादर (पू.), मुंबई ४०००१४.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९१०/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २०.०९.२०११ |

**३ उपस्थिती**

**अपिलकर्ता** श्री. एस.एन.शाह,
प्लॉट नं, ५१, ओझा स्ट्रीट,
गंगाराम चाळीजवळ, पाण्याची बावडी,
शिवडी क्रॉस रोड, मुंबई ४०००१५

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी- श्री.मिर्जा निसार बेग,
शिक्षणधिकारी (म.न.पा.) कार्यालय,
लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी,
दादर (पू.), मुंबई ४०००१४.

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशा.अधिकारी (शिक्षण) श्री.अशोकबी.बोज्जा,
शिक्षणधिकारी (म.न.पा.) कार्यालय,

| | |
|---|---|
| | लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी,<br>दादर (पू.), मुंबई ४०००१४. |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

अपीलकर्ता यांचे निवेदन : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व शाळांना सन २०००-२०१० या कालावधीत शासनाकडून,निमशासकीय संस्थांकडून व महानगरपालिकेकडून मिळालेले अनुदान, सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांकडून आलेल्या तक्रारी व त्यावरील कार्यवाही इत्यादी माहिती मागीतली होती. सदर माहिती देण्याचे आश्वासन जन माहिती अधिकारी यानी दिले परंतु त्यानुसार परिपूर्ण माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची होती. महानगरपालिकेच्या सर्व शाळांकडील एवढी विस्तृत स्वरुपाची माहिती संकलित करुन देणे शक्य नाही. तरीही मुद्दा क्र.२ बाबत त्यांचा अर्ज संबंधितांकडे वर्ग केला व ऊर्वरित माहिती त्याना समक्ष देण्यात आली.

अपिलीय अधिकारी - अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती १६ विभागांकडील होती. सर्व शाळांचे जन माहिती अधिकारी व त्या त्या विभागातील प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास देण्याचे आदेश प्रथम अपिलाच्या निर्णयात दिले. त्यानुसार प्राप्त झालेली ८ विभागांकडील माहिती अपीलकर्ता याना समक्ष देण्यात आली. ऊर्वरित ८ पैकी ४ विभागांकडील माहिती संकलित झाली असून ती सादर करण्यात येत आहे. अन्य माहितीचे संकलन पूर्ण झाल्यावर ती देण्यात येईल.

अपीलकर्ता यानी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ७(९) अन्वये ती नाकारता येऊ शकते. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी माहिती न नाकारता ती संकलित करुन पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र अशा स्वरुपाची माहिती संकलित करुन देणे दर वेळेस शक्य होईलच, असे नाही, हे लक्षात

घेता विविध विभागांमध्ये त्या त्या भागातील शाळांच्या संदर्भातील अशी माहिती संकलित स्वरुपात उपलब्ध ठेवण्याच्या सूचना अपिलीय अधिकारी यांनी परिपत्रकाद्वारे प्रसृत कराव्यात. तसेच सध्या संकलित स्वरुपात उपलब्ध झालेली माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार परिपत्रक काढण्यात येईल, असे अपिलीय अधिकारी श्री.मिर्जा निसार बेग यानी नमूद केले.

**<u>आदेश</u>**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांच्या संदर्भातील अनुदान, त्याचा विनियोग आदी स्वरुपाची माहिती संबंधित विभागांच्या पातळीवर संकलित स्वरुपात उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देणारे परिपत्रक काढण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय अधिकारी श्री.मिर्जा निसार बेग यानी दि.१५.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**

**दिनांकः २०.०९.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नों.क्र९२/अपील क्र.६९१०/२०११/०२
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :४ नोव्हेंबर,२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,
१)निवड नस्ती
२)स्वीय सहाय्यक

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. उत्तमकुमार वालजी पटेल,
द्वारा- अरुणा के. टांक, पन्हाळगड,
व्ही-७, रुम नं-२०२, अशोकभवन,
बोरिवली (पू.), मुंबई ४०००६६. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा अधिक्षक,
जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय (भूमापन शाखा),
जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र.२,
जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय (भूमापन शाखा),
जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९११/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २०.०९.२०११ |

**३ उपस्थिती**

**अपिलकर्ता** श्री. उत्तमकुमार वालजी पटेल,
द्वारा- अरुणा के. टांक, पन्हाळगड,
व्ही-७, रुम नं-२०२, अशोकभवन,
बोरिवली (पू.), मुंबई ४०००६६- उपस्थित.

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा अधिक्षक,श्री.संजय ढिकले,
जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय (भूमापन शाखा),
जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१.- उपस्थित

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र.२-श्री.के.वाय.म्हात्रे,
जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय (भूमापन शाखा),

| | |
|---|---|
| | जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड,<br>फोर्ट, मुंबई ४००००१.- गैरहजर |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता : प्लॉट क्रमांक ९६ए,९६बी आणि ९७ टीपीएस,माहिम विभागाबाबत बिनशेती प्रमाणपत्राची प्रत मागितली होती, ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - बिनशेती प्रमाणपत्र आमच्या कार्यालयाकडून वितरित केले जात नसल्यामुळे प्रत पुरविता येत नाही, असे श्री.पटेल याना विहित मुदतीत कळविले. त्याविरुध्द त्यानी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमि अभिलेख मुंबई शहर यांच्याकडे अपील केले. अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यांचा निर्णय योग्य ठरविला.संदर्भित मिळकतीला अकृषिक परवाना मिळालेला आहे किंवा नाही, याबाबतचे स्पष्ट पत्र ८ दिवसांत देण्यात येईल.

अपिलीय अधिकारी : मुंबई शहरामध्ये संपूर्ण क्षेत्र बिनशेती(नॉन ॲग्रीकल्चर) असून शेती मिळकत नाही. त्यामुळे अशा प्रकारचे प्रमाणपत्र दिले जात नाही, म्हणून अर्जदार मागणी करत असलेली माहिम टीपीएस II मधील अं.भू.क.९६ए,९६बी,९७ या मिळकतीबाबतचे एन.ए.(नॉन ॲग्रीकल्चर) प्रमाणपत्र देता येत नाही,असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिले असून ते अपिलीय अधिकारी श्री.संजय ढिकले यानी सादर केले आहे.

उभय बाजूंचे निवेदन व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि जन माहिती अधिकारी श्री.के.वाय.म्हात्रे यांनी मान्य केल्यानुसार संबंधित मिळकतीबाबतचे पत्र अपीलकर्त्यास ८ दिवसांत द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांक: २०.०९.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.०९३/अपील क्र.६९११/२०११/०२

१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२१ नोव्हेंबर,२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,
१)निवड नस्ती
२)स्वीय सहाय्यक
३) आवक लिपीक

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री.विजय के. चौहान,
२ए, सन अँड सी अपार्टमेंट, रॉयल लेन जवळ,
जूहूतारा रोड, सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००४९. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा उपआयुक्त(विशेष),
मुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पिटल एक्स्टे. बिल्डिंग,
आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा(प.), मुबई-४०००५०. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा अनुज्ञापन अधीक्षक,**
छत्रपती शिवाजी महाराज मार्केट बिल्डिंग,
चौथा मजला, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, मुंबई-४००००१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८१०/२०११ |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१.०९.२०११ |
| **३. उपस्थिती**<br>**अपीलकर्ता :** गैरहजर<br>**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा उपायुक्त(विशेष)<br>श्री.राजेंद्र भोसले -हजर<br>**जन माहिती अधिकारी**<br>श्री.सुदर्शन नामदेव आव्हाड,अनुज्ञापन अधीक्षक-हजर | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

नियमांचा भंग करुन लावलेल्या होर्डिंग्जच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यानी पुरविलेली माहिती योग्य व परिपूर्ण नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.विजय चौहान यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे. विशेषतः 'श्लोक मिडिया' बद्दलची माहिती मिळाली नसल्याचे त्यानी म्हटले आहे.

अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांशी संबंधित होती. त्यांचा अर्ज त्या विभागांकडे पाठवून तेथील जन माहिती अधिका-यांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन पुरवावी लागेल, असे अपीलकर्त्यास मुदतीत कळविले होते. त्यानुसार संकलित केलेली माहिती अपीलकर्त्यास प्रथम अपिलीय अधिकारी याच्या समक्ष दिली. प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान अपीलकर्त्याने आणखी एक मुद्दा उपस्थित केला. त्याबाबतची माहिती देण्याचे आदेशही अपीलीय अधिकारी यानी दिले. त्यासाठी प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. परंतु ते आले नाहीत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.सुदर्शन आव्हाड यानी केले.

माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांकः २१.०९.२०११** **राज्य मुख्य माहिती**
**आयुक्त**

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/१२/अपील क्र.६८१०/२०११/०२
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :४ नोव्हेंबर,२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,

१) निवड नस्ती
२) स्वीय सहाय्यक

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री.प्रशांत एस. कोकणे,
कॉ. वसंत परब मार्ग, भटवाडी हिल,
स्वस्तिक चाळ कमिटी, हनुमान मंदीराच्या मागे,
घाटकोपर, मुंबई-४०००८४. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा उपमुख्य अधिकारी,
उपमुख्य अधिकारी(पु.गा.) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
बांद्रा(पूर्व), कलानगर, म्हाडा, मुबई-४०००५१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मिळकत व्यवस्थापक,
उप-मुख्य अधिकारी(पु.गा.) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
बांद्रा(पूर्व), कलानगर, म्हाडा, मुंबई-४०००५१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८३०/०२ |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१.०९.२०११ |
| **३** | **उपस्थिती**<br>**अपीलकर्ता** : गैरहजर<br>**प्रथम अपिलीय अधिकारी** : गैरहजर<br>**जन माहिती अधिकारी यांचे वतीने** सहाय्यक, श्रीमती विद्या ना. वाघ,<br>उप-मुख्य अधिकारी(पु.गा.) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,<br>बांद्रा(पूर्व), कलानगर, म्हाडा, मुंबई-४०००५१.- उपस्थित | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

म्हाडाने विकसित केलेल्या रामदूत बिल्डिंग, करी रोड,महादेव पालव मार्ग, मुंबई-१२ येथील सदनिका क्रमांक ५८५ बाबतची सन १९७५ ते १९७७ या कालावधीतील माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी त्याबाबत काहीही कळविलेले नाही अशी तक्रार अपीलकर्ता श्री.प्रशांत कोकणे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील विभागांच्या कामकाजाची पुनर्रचना करण्यात आल्याने पुनर्रचित इमारतीमधील गाळयांची मूळ वितरण-नस्ती नव्याने निर्माण केलेल्या विभागनिहाय मिळकत व्यवस्थापनाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. तथापि पुनर्रचित इमारत 'रामदूत' मधील गाळा क्र.५८५ ची नस्ती संबंधित मिळकत व्यवस्थापक फ/दक्षिण विभाग यांच्याकडे पाठविली नसल्याचे कार्यभार हस्तांतरण यादीवरुन दिसून येते. नस्ती उपलब्ध होत नसल्यामुळे माहिती देता येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेल्या श्रीमती विद्या वाघ यानी केले.

संबंधित नस्ती ही सदनिकांच्या संदर्भातील महत्वाचा दस्तऐवज आहे. अभिलेख्यांच्या वर्गवारीनुसार ते कायमस्वरुपी जतन करावयाचे असून त्याची नस्ती उपलब्ध होत नसल्यास जतनाची जबाबदारी असणा-या संबंधितांकडून खुलासा घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ फौजदारी गुन्हा दाखल करण्यासह करुन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.
२) अपिलकर्त्यांनी मागणी केलेल्या नस्तीबाबत जतनाच्या कालावधीनुसार संबंधित कर्मचा-यांना विचारणा करुन व अभिलेखांचा सखोल शोध घेऊन जन माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांनी नस्ती प्राप्त करुन घ्यावी व अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क पुरवावी. नस्ती प्राप्त न झ ाल्यास जतनाची जबाबदारी असणा-या कर्मचा-यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम,२००५ अन्वये पुढील कारवाई करावी.

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांकः २१.०९.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ-२०११/३९०/अपील क्र.६८३०/२०११/०२

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :४ नोव्हेंबर,२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

प्रत,

३) निवड नस्ती
४) स्वीय सहाय्यक

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. हबीब उस्मान शेख व इतर,
मरिअम्मा नगर, रुम नं.एम-२०२, नेहरु सेंटर मागे, डॉ.ए.बी. रोड,
वरळी, मुंबई-४०००१८. तक्रारदार

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी** तथा वसाहत अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,
जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय, ना.म. जोशी मार्ग,
मुंबई-४०००१३. उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १. | तक्रार क्रमांक | १६६/०१ |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २०.०९.२०११ |
| **३** | **उपस्थिती**<br>**तक्रारदार -** अनुपस्थित, प्रतिनिधी दत्ताराम पेडामकर-उपस्थित<br><br>**जन माहिती अधिकारी** सौ. उज्वला चेतने,वसाहत अधिकारी,जी/दक्षिण विभाग विभाग -उपस्थित. | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले.

**तक्रारदार :** मरिअम्मा नगर येथे झोपडपट्टी वसाहतीमधील झोपडीधारकांच्या संदर्भात मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाची दि.१०.३.२०११ रोजी सुनावणी झाली. त्या दिवशी जन माहिती अधिका-यानी दिलेली माहिती बनावट असल्यामुळे संबंधितांवर कारवाई करावी व खरी माहिती मिळावी.

**जन माहिती अधिकारी-** तक्रारदारास मूळ कागदपत्रे छायांकित करुन घेण्यासाठी दिली असता त्यानी कागदपत्रे फाडून टाकल्याचे निदर्शनास आले. मूळ अर्जाप्रमाणे माहिती देण्यात आली असून ती मिळाल्याची त्यांची पोहोच आहे.

वस्तुतः आयोगाने संबंधित प्रकरणी निकाल दिला असून अपीलकर्त्यास माहिती दिली असल्याचे नोंदवून अपील निकाली काढले आहे. या परिस्थितीत प्रस्तुत तक्रार पुन्हा दखलपात्र ठरत नाही. तथापि तक्रारदारास हवे असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील. शासनाची मूळ कागदपत्रे छायांकित करुन घेण्यासाठी संबंधित तक्रारदाराकडे सोपविण्याची जन माहिती अधिकारी श्रीमती उज्वला चेतने यांची कृती योग्य नाही. याबाबत जन माहिती अधिकारी श्रीमती चेतने याना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांकः २१.०९.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्र.मुमाआ-२०११/६१४/६१४-अे/त.क्र.१६६
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,

मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांकः ४ नोव्हेंबर,२०११

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुबई

प्रत,

१)निवड नस्ती
२) स्वीय सहाय्यक

Doc d,dhanashree2011/shree21sept2011

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. अरुण जुन्नरकर,
द्वारा- अनि गारमेंट, एफ-१/९, १ला माळा,
दि-मॉल, ईश्वरलाल पारेख मार्ग, मालाड(प.),
मुंबई-४०००६४. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता. उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-६४.

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.अभियंता(परिरक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-६४.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८३४/०२ |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१.०९.२०११ |
| **३** | **उपस्थिती**<br>**अपीलकर्ता** : गैरहजर<br>**प्रथम अपिलीय अधिकारी** : गैरहजर<br>**जन माहिती अधिकारी:** श्री. प्रल्हाद कदम उपस्थित. | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

साईनाथ रोड,मालाड(प.) येथील रस्ता रुंदीकरणाचा आराखडा, बाधित बांधकामांना दिलेल्या बांधकामाच्या व पर्यायी जागांची परवानगीची प्रत इत्यादी माहिती अपिलकर्ता यांनी मागितली होती. त्यांच्या दि.१६.७.२०१० च्या अर्जाला दि.२३.७.२०१० च्या पत्रान्वये उत्तर देऊन शुल्क कळविले. परंतु देऊ केलेली माहिती त्याना नको होती. सहाय्यक आयुक्त(बाजार), छत्रपती शिवाजी महाराज मंडई, फलटण रोड यांच्याकडून त्याना माहिती हवी होती. संबंधित नस्ती त्या कार्यालयात पाठविण्यात आली असल्याचे व अपीलकर्त्यांनी माहिती तेथून उपलब्ध करुन घ्यावी

असे त्यांना लेखी कळविले होते. त्या कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास सशुल्क द्यावी, असे आदेश अपिलीय अधिकारी यानी दिले. त्यानुसार माहिती प्राप्त करुन घेऊन कळविलेले शुल्क अपीलकर्ता यानी भरले नाही. त्यामुळे माहिती देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.प्रल्हाद कदम यानी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील तरतुदीनुसार माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे/कार्यालयाकडे असल्यास ५ दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यानी अर्ज वर्ग करणे आवश्यक होते. त्याबाबत जन माहिती अधिकारी श्री.प्रल्हाद कदम याना समज देण्यात येत आहे. तसेच अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.१०.२०१० रोजी आदेश दिल्यानंतर संबंधित अर्ज सहाय्यक आयुक्त यांच्याकडे दि.१३.७.२०११ रोजी वर्ग करण्यात आल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते. या विलंबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी श्री.प्रल्हाद कदम यानी करणे आवश्यक आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलीय अधिका-यांच्या आदेशानंतर अन्य कार्यालयाकडे अर्ज वर्ग करण्यास झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांकः २१.०९.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**